म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ५३५
१९३३

# निर्माल्य-माला

आवक १०८८
१८-८-३३

REFBK-0005620
REFBK-0005620

विमला देशपांडे
पु. य. देशपांडे

१५७१०३३

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. काव्य नं. १०६५८
ता. १७/५/३३
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६...
ठाणे.

# निर्माल्य-माला

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५६२०

विमला देशपांडे
पुरुषोत्तम यशवन्त देशपांडे

REFBK-0005620
REFBK-0005620

किंमत १० आणे

## विदर्भ प्रकाशन संस्था:-

संस्थापक:—अ. तु. वाळके संपादक वऱ्हाड-शाळापत्रक

संपादक:—पी. आर. पाठक

चालक, मुद्रक व प्रकाशक:— पद्मनाभ विष्णु जोशी
प्रोप्रायटर श्री सोमेश्वर प्रेस उमरावती

आवृत्ति पहिली एप्रिल, १९३३

( सर्व हक्क लेखकांचे स्वाधीन )

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे
मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नं.
ता.
ठाणे

# प्रकाशकाचें निवेदन.

सुप्रसिद्ध कादम्बरीकार श्रीयुत पु. य. देशपांडे व त्यांच्या विदुषी पत्नी सौ. विमलाबाई देशपांडे यांचीं वीणा–गीतें प्रस्तुत पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा योग आज येत आहे. संस्थेचें प्रथम प्रकाशन "संवेदना" प्रकाशित झाल्यानंतर श्रीयुत बा. सं. गडकरी यांची "वृन्दा" कादंबरी संस्थेचें द्वितीय प्रकाशन ह्मणून प्रसिद्ध करण्याचें जाहीर करण्यांत आलें होतें; परंतु रा. गडकरी यांना अमर्याद कार्य-व्यापृततेमुळें कादंबरी तांतडीनें पुरी करणें अशक्य झालें. त्यामुळें देशपांडे पति-पत्नींना एकादा ग्रंथ संस्थेकरितां लिहून देण्याचा आग्रह करावा लागला. आमच्या विनंतीप्रमाणें आपली वीणा–गीतें संस्थेला प्रकाशनार्थ देऊन देशपांडे पति–पत्नींनीं आह्मांस उपकृत करून ठेवलें आहे.

निर्माल्यमालेचें स्वरूप व अंतरंग हीं मराठी वाङ्मयांत तरी अभिनव ठरतील असें वाटतें. "माला" रूपानें सौ. विमलाबाईनीं आपलें प्रत्यक्ष प्रीतिरूप चितारिलें असून "निर्माल्य" रूपानें रा. देशपांडे यांनीं आपल्या प्रीतिविषयक कल्पनांची व आकांक्षांची सद्यःकालीन परिणती निवेदन केली आहे. पति–पत्नीनें परस्परास आपापल्या प्रीतिभावनेचा व्यक्त आविष्कार काव्यरूपानें अर्पण करण्याचा हा प्रयत्न मराठी वाङ्मयांत तरी नवीनच ह्मटला पाहिजे. तो जसा कौतुकार्ह तसाच हृद्य आहे. रसिक वाचकांच्या आदरास तो पात्र होईल अशी आशा वाटते.

संस्थेच्या प्रथम प्रकाशनाचा महाराष्ट्रवाचकवर्गाकडून चांगला पुरस्कार झाला. विद्वज्जनांनीं व नियतकालिकांनीं त्याचा यथायोग्य

परामर्ष घेतला. त्यामुळें प्रकाशनाचें कार्य उल्हासानें चालविण्याचें बळ संस्थेस आलें. संस्थेच्या कार्यास असेंच सक्रिय पाठबळ महाराष्ट्ररसिक-वर्गानें द्यावें अशी विनंती आहे.

संस्थेचीं पुढील प्रकाशनें " अपोलोबंदरावर " व " वृन्दा " छापून होत आहेत. यापुढें दोन दोन महिन्यांच्या अवधीनें वाचकांस तीं सादर करण्यांत येतील.

उमरावती
ता. २२-४-१९३३

सर्वांचा नम्र,
**पद्मनाभ विष्णु जोशी**
चालक, **विदर्भ प्रकाशन संस्था.**

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
संग्रह नं.
ता.
ठा णे.

# माला

( विमला देशपांडे )

१९२४

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
संग्रह नं.
ता. १८-६-३३
ठाणें.

# निर्माल्य-माला

—:o:—

## माला

-*-

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५६२०
क्र.

१

हर्दीचा भाव एकेक । जरी मीं तुजसि वाहियला ॥
कधीं काव्यांत गुंफून । कधीं चित्रांत रंगविला ॥

जरी गाईन दिनरात्रीं । तुजसि मी भावनागीतें ॥
कृती जरि जीवनाची या । तुझ्या प्रीतीमधें फुलते ॥

उसळती लहरि प्रेमाच्या । कितीशा तरिहि हृदयांत ॥
भरूनी नेत्र हे येती । तुला कां वाहुं अश्रूंत ॥

सकल हृद्भाव अर्पीतां । तनूचा अंत होईल ॥
कितिक राहूनि अव्यक्त । तुझ्याभंवतीं विहरतील ॥

कशीं तोडूं अनंत सुमें । नको नां दुखवुं या वेली ॥
जिवाची माझिया बाग । तुला सर्वस्वि अर्पियली ॥

## माला

२

रवीनें किरणशब्दांनीं । दिनभरी काव्य जें लिहिलें ॥
दिनान्तीं मावळुनि जातां । दिसे तें पुसुनिया गेलें ॥

तमानें व्याप्त नभ झालें । वरीखालींहि अंधार ॥
हळुंच ये प्रेमस्फूर्ती ती । उजळले दीप चौफेर ॥

खुलति कां भावना हृर्दिच्या । –नव्हे या तारकाओळी ॥
नभाच्या जीवनाची ही । कुणी कविता मधुर केली ॥

निघालें तेजमय गीत । नभाच्या जीवकवितेंत ॥
कळेना हृदय माझेंही । कशानें सारखें गात ॥

जिवाचें माझिया केलें । सहज तूं काव्य स्वर्गीय ॥
कवींचा असासि तूं राजा । तयांचें शब्दमय काव्य ॥

## बाला

३

जिवाचें काव्य या होतां । सरतसे काव्य शब्दांचें ॥
जगासाठीं लिहूं काव्य । कशाला तूंच जग माझें ॥

तुझ्याशीं बोलतां माझे । जहाले काव्यमय बोल ॥
तुला पाहून मी गातां । सुरांचें काव्य होईल ॥

विहग उद्यानिंचे जरि ते । सहज घेतील ऐकोनी ॥
लतावृक्षांवरुनि जातां । मधुर गातील तीं गाणीं ॥

निसर्गाचें जगत् सारें । भरे माझ्याच गीतांनीं ॥
नकळतांना मला सारें । चहुंकडे तींच तीं गाणीं ॥

मला हें जग नसे ठावें । तुझ्यासाठींच जीवन हें ॥
बहर जो येइ काव्याला । तुझ्यासाठींच तो आहे ॥

## माला

### ४

कसा एकेक दिन जातो। तुझ्या सहवासिं सोन्याचा॥
सभोंतीं पसरलें सोनें। रवी वर्षाव करि त्याचा॥

निशीथीं जग तमीं बुडलें। पहांटेची बघत वाट॥
सदा हांसे प्रभात परी। तुझ्यामाझ्याचि हृदयांत॥

उषेचें सरल तें हास्य। प्रखर माध्यान्हिचें तेज॥
मधुरता खिन्न संध्येची। निशेचा तारकासाज॥

तशी गंभीर ती शांती। जणूं एकाच या ठायीं॥
तुझ्यामाझ्याचि प्रीतींत। सुखानें नांदताहे ही॥

विखुरलेलेंच विश्वांत। असें जें रम्य जें दिव्य॥
सकल सौंदर्यसार परी। तुझें हें प्रेम स्वर्गीय॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ...
ठाणे



मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ...... नं. ......
ता. ......
ठाणे.

## माला

### ८

नभाच्याही पलीकडच्या । तुझ्या त्या कल्पनाआशा ॥
कशा हातीं सहज येती । किती दुखवी तुज निराशा ॥

विभव विसरूनि हें इथलें । वरिवरी सारखा जासी ॥
विच्यारांच्याचि भंवऱ्यांत । कितीतरि एकला फिरसी ॥

कशी मी शांतवूं तुजला । धरूनी हृदयें ठेवियलें ॥
तिथें आश्वासुनी अजुनी । कसें तव खिन्न मन झालें ॥

विचारांचाचि कल्लोळ । जहाला मानसीं तुझिया ॥
तयाला वाट दे करुनी । हृदयसिंधूंत ह्या माझ्या ॥

फुटूं दे बांध मौनाचा । जलीं मज वाहुं दे—बोल ॥
जिवाच्या जिवलगा बोल । जिवींच्या हृत्सुमा उमल ॥

## माला

६

मजासि जग वाटलें होतें। किती जीवाहुनी दूर॥
कशी कर्तव्यमय बनलें। मला माझें हृदय दूर॥

तुझ्या त्या दिव्य प्रीतीनें। पुनर्जन्मास मी आलें॥
तिनें हें हृदय उजळीलें। अपूर्वचि दृश्य मज दिसलें॥

विहरतां जीवनोद्यानीं। फुलांचे ताटवे फुलले॥
कितिक मीं तोडिलीं कुसुमें। तयांचे गुच्छ बनवीले॥

सरोवरिं प्रीतिच्या दिसलीं। दुरूनी भावनाकमलें॥
उडी घेवोनिया आंत। फुलांचे जमविले झेले॥

मनीं चिंतन तुझें चाले। करानें माळ गुंफित ही॥
नसे ही माळ कमळांची। जिवाची माळ तुज वाही॥

## माला

७

जुईचीं धवल, सुकुमार । अणियलीं एकदां कुसुमें ॥
सुमन एकेक तें खुडितां । ‘तुझ्यासाठीं’ –मनास गमे ॥

भुईवर ओतलीं—वाटे । फुलांचा तो सडा बघुनी ॥
किती गुंफूं तुला माळा । कशा सूत्रांत ओवोनी ॥

धरूनी दों करीं माळ । फुलांनीं दाटली—गमली ॥
कुठेंही ना दिसे दोरा । —खरिच प्रीतींत गुंफियली ॥

तुझ्या कंठांत घालाया । किती उत्कंठ मन होई ॥
परी—तूं दूर आठवुनी । हृदयिं मी ठेवुनी देई ॥

तधींची माळ सुकलेली ! सुवासित प्रीतिनें झाली ॥
हृदयिंची काढुनी वाही । विवाहाच्या तुला कालीं ॥

माला

८

प्रभातीं रोज उठतांची । मना हुरहूर ती वाटे ॥
रहावें स्वप्नसृष्टींत । नकोसें सत्य जग होतें ॥

प्रभातीं नाथ जइं भेटे । कमल तें हांसतें डुलतां ॥
कुणाचा मजासि परि ध्यास । सदा ये खिन्नता चित्ता ॥

उषेचें करित स्वागत मी । जडमनें ती जरी हंसते ॥
लपवुनी माझिया दुःखा । तिजकडे हांसुनी बघते ॥

कुठुनि मम प्रीतिभास्कर हा । उगवला हृदयगगनांत ॥
सकाळीं उघडितां नयन । जिवाचा भेटला नाथ ॥

हंसे हृत्कमल खुद्‌कन हें । उमलल्या पाकळ्या साऱ्या ॥
तधीं जें स्मित मुखीं खुलले । पडे कां खंड कधिंहि तया ॥

## माला

१

सदा कर्तव्यप्रीतीचा । कलह माझ्या मनीं चाले ॥
समजुनी ध्येय कर्तव्या । मुकें प्रेमास मीं केलें ॥

चढत मी उंचशा शिखरीं । दुरी सारून प्रेमाला ॥
कुठूनी स्थैर्य मग यावें । जिवाचा तोल मम सुटला ॥

तिथें धांवूनि तूं येशी । क्षणीं हृदयाशिं मज धरिलें ॥
अजवरी खोल दडलेलें । उसळुनी प्रेम वर आलें ॥

पटे हृदयास ओळख ती । उमजलें जीवनश्रेय ॥
वहात्या अश्रुधारांनीं । निघालें धुवुनिया हृदय ॥

फुलविलें हृत्सुमन माझें । सरींनीं आंसवांच्या त्या ॥
हंसत मी आंसवांमधुनी । चरणिं तें वाहिलें तुझिया ॥

## माला

१०

सकलही हृदय ओंतून । लिहियलें काव्य प्रीतीचें ॥
जिवाच्या ईश्वरा वाही । कुठुनी उपमा मिळे त्यातें ॥

कवींच्या या नभःप्रांतीं । दिसे ती शुक्रताराच ॥
कुठुनि परि काजव्यामाधिं या । दिसावें दिव्य कवितेज ॥

असूं दे काजवा काव्यीं । तुझ्या मी चांदणी हृदयीं ॥
दंवानें प्रीतिच्या नटतां । फुलें मम मोतियांचीं हीं ॥

पहा शब्दांत अस्फुट या । हृदय सारें कळेल तुला ॥
जरा निरखून बघ तारा । दिसे मग दिव्य रविमाला ॥

तुझ्या या प्रीतिनयनांनीं । पहा मम जीविंचें काव्य ॥
जरी अव्यक्त, अस्फुट तें । तुझ्या हृदयांत सर्वस्व ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६०७८
ठाणे.



मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
सं. काव्य नं. १०८१०
ता. १७-७-३३
ठाणें.

## माला

### ११

निसर्गीं अजुनि हेमंत । जरी वाहे मधुर वात ॥
कसा माझ्याच मग हृदयीं । वसंता, फुलसि बहरांत ॥

मनाचे गाति कोकिल हे । विहरतां अंतरालांत ॥
बनविली गानमय सृष्टी । चहुंकडे कुणितरी गात ॥

फुलांचे गंध दरवळती । तयांना वायु पसरीत ॥
मनीं, विपिनींहि, उद्यानीं । उमलतांना कळ्या हंसत ॥

वसंता फूल घे पहिलें । तुझ्या नवमालिकेचें हें ॥
पुढतिंच्या सर्व बहरांचा । जयामधिं गंध भरलाहे ॥

अजवरी वाहिल्या माला । परी अजि एकली घेई ॥
भरे हृद्गंध मम जींत । वसंता, मालिका घेई ॥

## माला

### १२

नभाच्या अंगणीं नील। मऊशा शुभ्र मेघांत॥
जणूं खेळे लपंडाव। विखरितां तेज हा चांद॥

गवाक्षीं बसुनिया अपुल्या। गळां घालूनिया हात॥
नको या चंद्रमातेजीं। बघूं ये प्रीतितेजांत॥

सकल विश्वांतलीं दिव्यें। नभाचें भव्य सौंदर्य॥
तुझ्यामाझ्याचि हृदयाचें। नसे प्रतिबिंब हें काय॥

जगाचे पाश हे विरले। नभाच्या या उदात्त रसीं॥
तुझ्यांतचि एक मी झालें। निमालें विश्व प्रीतिरसीं॥

पहाणें कोठलें आतां। असे हें विश्व अपुल्यांत॥
भंवतिं निर्मून लीलेनें। बघूं बसुनी गवाक्षांत॥

## माला

### १३

जरी तूं गोड वाणीनें । मला उपदेश करितास ॥
विमल मी जाहलें असतें । सकल जाऊनिया दोष ॥

परी मग जीवकलिका ही । अकालीं फुलुनि येईल ॥
तिचा हो गंध मग अपुरा । खुरटती पाकळ्या लोल ॥

मधुर अंतर्विकास परी । कळीचा व्हावयासाठीं ॥
जिवाची मूक मम कलिका । हळुंहळूं पाहिली फुलती ॥

तुझ्या प्रीतिप्रकाशांत । उमलल्या जीवपुष्पाला ॥
हंसुनिया भावदृष्टीनें । हृदयिं तूं धरियलें मजला ॥

'किति तूं गोड झालीस' । हृदय नयनीं जणूं बोले ॥
न माझी मधुरता, देवा । जिवा या तूंच फुलवीलें' ॥

माला

## १४

करीं घेऊन बांसरि ही । हृदयिचें गीत वाजविसी ॥
'तुझ्या बोला जिवा बोल'। रवानें हृदय मम भरिसी ॥

तदा ये कंठ दाटून । मुखीं ना शद्ब एकहि ये ॥
कशी बोलू अतां सांग । कसें मीं हृदय उकलावें ॥

तुझी उत्कट परी आस । हृदयिंच्या सागरांतून ॥
कितीही खोल लपलेलें । वरी घेऊनि ये रत्न ॥

नयनिं मम वाहती अश्रू । तयां वाचा फुटे काय ॥
तुझ्या प्रीतिप्रभावानें । जहाले बोल ते दिव्य ॥

दिसे माझें जगा काव्य । न माझे बोल त्यांमधले ॥
वहाती सतत प्रेमाश्रु । तुजमुळें काव्य तें झालें ॥

## माला

१८

वहातो वात दुःखांचा । निराशेचाचि अंधार ॥
जिवावरि कोसळूं दे या । कितीही संकटें घोर ॥

तुझे परि बाहु मजभंवतीं । जिवाच्या कठिण मार्गांत ॥
किती मज सांवरुनि नेती । उरेना भीति हृदयांत ॥

जसें गाभ्यांत वृक्षाच्या । तुझ्या प्रीतीविसाव्यांत ॥
वरी चाले तुफान सरी । बसे मैना सुखी आंत ॥

गुलाबांचा सडा पसरे । चहुंकडे या पथावरतीं ॥
पडतिं परि पाउलें माझीं । फुलांच्या पाकळ्यांवरतीं ॥

तुवां कां काढिले कांटे । विसरलें 'दुःख' हा शब्द ॥
अपुलिया प्रीतिराज्यांत । सदा आनंद आनंद ॥

## माला

### १६

अगाधचि विश्वसागरिं या । जिवाची  नाव मम चाले ॥
सभोंतीं नाच लहरींचा । वरी नभ तारकांत खुलें ॥

तुटुनि खळकन् पडे तारा । बसुनि ये जीवनौकेंत ॥
तमीं मी मार्ग आक्रमिला । तयाच्या प्रीतिकिरणांत ॥

कधीं लाटा तुफानाच्या । दुरावति जीवनौकांस ॥
दुरुनि ये प्रीतिची हांक । मिळे मग धीर जीवास ॥

जंई तो उदधि हो शांत । तदा नौका जवळ येती ॥
मधुर दुरुनीच ते शद्व । हृदयिंचे भाव शांतविती ॥

—अतां आलों घरीं अपुल्या । तरुनिया विश्व शद्वांचें ॥
तुझ्या आलिंगनीं अपुले । निमाले शद्व प्रीतीचे ॥

## माला

### १७

गगन आच्छादिलें मेघें । लपविला चांदही आंत ॥
लतावृक्षांचिया खालीं । पडे काळोख तो मंद ॥

हळुंहळूं पावसाची ती । वरूनी शांत येत सरी ॥
गळति जणुं अश्रु पानांचे । टपकती बिंदु भूमिवरी ॥

तरूवेलींमधुनिया तों । पवन निःश्वास जणु टाकी ॥
कशाला शांतकालीं या । मनांताचि वृक्ष हे रडती ॥

वियोगीं तूझिया देवा । मनाची खिन्नता असली ॥
उसासे, आंसवें माझीं । मला दिसतीं सभोंतालीं ॥

पहा तो इंदु वर आला । हंसतसे सृष्टि पानांची ॥
कधीं येशील तूं प्राणा । फुलें होतील अश्रूंचीं ॥

माला

## १८

वियोगें खिन्नता येई । तिची काळी पडे छाया ॥
हृदयिंचें प्रीतिकासार । सकल ती टाकि व्यापुनिया ॥

पसरती कल्पनेमाजीं । घन—जणूं दोष माझे ते ॥
सरोवर विमल मग सारें । वघुनि त्या काळवंडे तें ॥

तुझी प्रीति परी दिव्य । तिचा आत्माचि आनंद ॥
तिला मी काळिमा अणिला । वितरुनी खिन्नता तींत ॥

कशी वेडी अशी बनलें । सहज हा भाव नच माझा ॥
दुरी बघ सारिले मेघ । उसळला झोत तेजाचा ॥

रजतमय प्रीतिसर झालें । सडा नवमालिकांचा हा ॥
खरें आनंदमय प्रेम । फुलत आनंद हृदयीं या ॥

## माला

### १९

अपुलिया जीवनांतील । मधुरसे किति प्रसंग इथें ॥
विहरती स्मृतिसुमनरूपें । नकळतां आसमंतीं ते ॥

तयांमधिं हृदय मम फिरतां । परिमळें गोडशा भरतें ॥
जुईजाईवरुनि जातां । पवनलहरीहि दरवळते ॥

इथें या बाभळीखालीं । हृदय होवोनि सोत्कंठ ॥
सुखाचें कोंदलें विश्व । क्षणाच्या दृष्टिभेटींत ॥

स्मरणिं ये रम्य तव स्थान । मधुर मोहोर आंब्यांचा ॥
वसंतें चुंबिला वारा । खुले नभिं साज संध्येचा ॥

पुणें हें आवडे मजला । स्मृतींनीं नां तुझ्या भरलें ॥
तुजविना शून्य मज सारें । तुझ्यांतचि विश्व मम भरलें ॥

## माला

२०

कुठुनि आलास जीवनिं या । कसा तेथेंचि तूं फुलला ॥
ह्मणति कुणि 'सहज तो आला । नकळतां लाभला मजला' ॥

हृदय माझें परी सांगे । असे जी पूर्णताआस ॥
रुजुनि ती जीवनीं माझ्या । कळी ये जीववेलीस ॥

तुझ्या प्रीतिप्रकाशांत । नयनिंच्या भावलहरींत ॥
क्षणीं जीवनकळी फुलली । बहरली बाग हृदयांत ॥

क्षणिक नच एकजीवन तें । न झालें सहज दैवानें ॥
जवळ दोघेहि नां आलों । हृदयिंच्या दिव्य इच्छेनें ॥

प्रचंडचि व्याप गगनाचा । पलिकडे तारकापंक्ती ॥
अनंतीं चाल विश्वाची । वसे सर्वांवरी प्रीती ॥

## माला

### २१

जिवाला लागली ओढ । घराचा सारखा ध्यास ॥
सदा मन वाट हें पाहे । 'अपेक्षा' एक ही आस ॥

जहाली सांज कां आतां । दिनाचे संपले श्रम ते ॥
घरा जाती जनहि सारे । विहगमाला घरीं जाते ॥

तुटूनी पाश काळाचे । जडपणा टाकुनी येथें ॥
पवन वाहे तयासंगें । घरीं जाण्यास मी निघतें ॥

विहग वृक्षावरी निजले । चढें मी तारकालोकीं ॥
किती हा जीव मम दमला । किती जाणें असें अणखी ॥

कुठें घर आपुलें आहे । जगीं या कीं अनंतांत ॥
हृदय तव हेंच घर माझें । तिथें निजतें अतां शांत ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५६२०
दा. क्र.

## माला

२२

'स्वदेशावरि धरा प्रीती । समाजाचें करा कार्य ॥
विसरुनी सुखविलास अतां । कळुनि घ्या काय कर्तव्य' ॥

ह्मणूं दे थोर लोकांना । निराळा मार्ग परि माझा ॥
उमळुनी आंतुनी येई । खरा तो हेतु जीवाचा ॥

किती तरि कल्पना वाटे । मनामधि खोल जणुं रुजल्या ॥
नसति मम ह्मणुनि त्या साऱ्या । जशा आल्या तशा गेल्या ॥

रुजे हृदयांत जें बीज । तुझ्या या प्रीतिचें दिव्य ॥
तयाचा आज बघ झाला । अमर हा वृक्ष स्वर्गीय ॥

सहज तो फुलुनि येईल । सभोंतीं गंध उधळील ॥
चिमुकलें हें जरी कार्य । सकलही विश्व हलवील ॥

स्थळ प्रत
सं. ........ क्रं. ........
ता. ............

# निर्माल्य

( पुरुषोत्तम यशवंत देशपांडे )

१९३२

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
ठाणे.

# निर्माल्य-माला

—:o:—

## निर्माल्य

-*-

### १

आण पेला भरुनि सखये विसरण्या अपुले-पण,
यातनांची टोचणी, अज्ञानमय हें जीवन ॥

यौवनाचीं उच्च ध्येयें, दिव्य प्रीतीमीलन,
सौख्यमय ती काव्यसृष्टी,-भासमय तें जीवन ॥

चमकल्या चपलेपरी ज्या तेजमय आशा नव
मेघवत् थैमान करुनी जाहल्या अश्रूमय ॥

—पाहिलें जें प्रथमभेटीं, वाटलें जें त्या क्षणीं—
हाय! कोठें ?— आण पेला विसरण्या तें या क्षणीं ॥

## निर्माल्य

२

सुमन फुललें, परिमलानें व्याप्त सारें उपवन
गंधमय तो श्वास खुलवी अंतरीचें जीवन ॥

शीतवायू संग करुनी दूर नेई परिमला—
गंध सरला, सुमन सुकलें, श्वास केवळ राहिला ॥

गंधविरहित वायु मिसळे श्वसनिं माझ्या सर्वदा
सुमनविरहित बाग पसरे—लोपली रमणीयता ॥

आण सखये, आण पेला, वास त्याचा पसरुं दे
प्राणरूपी श्वास माझा गुंग त्यांतचि होउं दे ॥

## निर्माल्य

### ३

दृष्टि पाही सृष्टि सारी जन्मदिवसापासुनी
काय दिसलें ? गवसला कां ज्ञानकणलव त्यांतुनी ? ॥

सृष्टि फिरते, दृष्टि विरते, काळरजनी पसरते—
सरण रचलें, प्रेत जळलें,— चक्र चालें अचुक तें ॥

शाश्वताचें गीत मंगल नाचलें ज्यांच्या मुखीं
आणि ज्यांचे जीवक्षण ते रंगले सरत्या सुखीं ॥

सर्व गेले, सरणिं जळले, परतले कां ते पुन्हा?
ज्ञान, प्रगती—रम्य मृगजल !—आण पेला तो पुन्हा ॥

## निर्माल्य

### ४

येइ सखये, आण पेला, काळ जातो निशिदिनीं
देह अपुला यंत्रघटिका, पात्र भरतें प्रतिक्षणीं ॥

जीवनौका स्वैरतेनें फिरत मृत्यूसागरीं
राज्य अपुलें त्यांत वाटे—छिद्र होतें अरतळीं ॥

वायुवेगें वल्हवीली पैलतीरा जावया
कीर्ति-ईर्षा धीर देई पुढतिं पुढतीं न्यावया ॥

कितिक नौका पडति मागें, कितिक बुडती सागरीं
नाविकांच्या जलसमाधी तुडवुनी गेलों दुरीं ॥

हाय! दिसलें नील जल तें दृष्टि वळतां पदतळीं—
गळति वल्हीं, झरति अश्रू, आण पेला लवकरी ॥

## निर्माल्य

६

काय अपुलें श्रेय जीवा? काय अपुलें ध्येय वा?
काय आशा? काय इच्छा? काय अंतिम प्रेय वा? ॥

सांगतो इतिहास कां हें? साध्य कळलें कां कधीं?
साध्य कळतां साधनांचें ज्ञान झालें कां कधीं? ॥

"ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या" सर्व कळलें बोलती
ज्ञानमार्गें, भक्तिमार्गें, कर्ममार्गानेंहि ती ॥

प्राप्त होई निश्चयानें मानवांना पूर्णता
सत्य हें जर हे अजूनी दुःखडोहीं बुडति कां ॥

जीव दुर्बल? आणि जग हें गाढ तमिं कां धडपडे?
कां न अजुनी मार्ग ये निःशंकसा दृष्टीपुढें? ॥

## निर्माल्य

—ब्रह्मसुख तें स्वप्न सुंदर भ्रांतिमय मायाच ती
ज्यां दिसे त्यांच्याचि संगें नष्ट होउनि जाय ती ॥

सत्य त्यांचे शब्द केवळ, मार्गदर्शक ना मुळीं
दुःख अपुले, प्रश्न अपुले हाचि पेला सोडवी ॥

## निर्माल्य

६

सांगती गीतार्थवेत्ते मार्ग मोहक मुक्तिचा
अर्जुनाचा मोह हरिला, मार्ग भगवद्भक्तिचा ॥

" ब्रह्म आणिक अंतरात्मा एक जाणुनि घेइ जो
संसृतीचे पाश सुटुनी मुक्त होई जीव तो ॥

कर्म तें निष्काम होतां बंध तुटती सर्वही
आसविरहित भाव होतां जीव विरतो शाश्वतीं ॥

'मा फलेषु' स्मरणिं ठेवी, दुःख त्याचें संपलें
स्थिर प्रज्ञा होउनी आनंदिं सत्चित् रंगलें " ॥

## निर्माल्य

७

उसळली मनिं आस त्या क्षणिं पटलि जीवा ओळख
आंसवांच्या सरिंत खुललें अनंताचें फूल ग ॥

काम अन् आसक्ति सोडा, ब्रह्म आत्मा ओळखा
सर्व करुनी काय मिळतें? निरस मुक्ती शुष्कता ॥

ह्मणति मुक्ती लाभली ते सर्व गेले मरुनिया
मुक्ति त्यांची, ज्ञान त्यांचें, काळ नेई हरुनिया ॥

'कर्म करणें हेंचि हातीं'—तत्व हें निःसार गे
जन्मला कां जीव रसमय याचसाठीं जिवलगे ? ॥

दुःख सुंदर फलाशेचें, भावमय ती सजिवता
आसविरहित कर्म तें निःसत्व, निर्जिव रूक्षता ॥

## निर्माल्य

८

सजिवतेचा स्पर्श सोडुनि दूर जाई तत्व जें
सत्य ना तें ज्ञान अन् विज्ञान, भ्रामक स्वप्न तें ॥

सृष्टिमधुनी विलसतें चैतन्यमय हें सत्य जें
जीव जीवा भेटतां तें प्रीतिहृद्यीं उसळतें ॥

अंत ना तें दुःख साहिन भेटण्या तुज जिवलगे
ब्रह्मसुख तें दूर सारिन दुरुनि बघण्या तुजकडे ॥

भावमय तव दृष्टि येतां माझिया नयनांपुढें
ब्रह्म, आत्मा, मोक्षसुख तें तुच्छ वाटे त्यापुढें ॥

## निर्माल्य

नाहिं जेथें सजिव काया प्रीतिमय तव जिवलगे
स्वर्ग, मुक्ती, स्थित प्रज्ञा,—व्यर्थ वाटे सर्व तें ॥

—शल्य सलतें नित्य अंतरिं एक केवळ प्रेमलें—
अनंताचें दार उघडे—भाव परि हे आंधळें ॥

## निर्माल्य

मराठी ग्रंथ संग्रहा
स्वतंत्र प्रत
सं. ...... नं. ......
ता. ......
ठाणे.

९

एकला हा जीव जोंवर फिरत होता या जगीं
अंधतेनें काळ नेई, जात तिकडे सहजची ॥

काळगंगा ओढि सृष्टी काष्ठवत् शून्याप्रती
प्रीतिमय तव दृष्टिनें मज विलग केलें त्यांतुनी ॥

विश्व—भिन्नचि दृष्टि येई, सृष्टि बदले रूप तें
ओघगतिचा मूळ हेतू प्रीतिमधुनी सळसळे ॥

वाढते ही विश्ववेली प्रीतिचैतन्यामुळें
सुकुनि ती जाईल सारी—तोडिलें जर मूळ तें ॥

मानवांना मानवांचे भाव कळती ह्मणुनि ना
चालतो संसार सारा ? सत्य एकचि भावना ॥

## निर्माल्य

प्रीति करि ना ज्ञात जोंवर हृदय हें हृदयासि गे
तोंवरी अज्ञात सारें, विश्व अज्ञाचि राहि गे ॥

क्रूरता वा विषमता, अन्याय सारे आजचे
दृश्य फल तें मानवांच्या भावविरहित वृत्तिचें ॥

—मूळ हेतू सळसळे जरि प्रीतिमधुनी हृदयिं या
स्पर्श त्याचा नित्य हो परि रूप न दिसे डोळियां ॥

येइ सखये, रूप तव डोळे भरूनी पाहुं दे
आण पेला, पान करितां अंध होउनि जाउं दे ॥

## निर्माल्य

### १०

शास्त्रवेत्ते आजचे हे सांगती निर्भयपणें
'पाहुनी ह्या भव्य शाला, थक्क होउनि जा निके ॥

गगन भेदुनि तारकांच्या वेधिल्या आह्मी गती
कल्पनेच्या पार वसती करितसे अमुची मती ॥

फोडुनी दिक्कालबंधन निश्चयें कथितों अह्मी
शेकडों वर्षांतरीची सूर्यमालेची स्थिती ॥

स्थूल आणिक सूक्ष्म यांचे ज्ञात आह्मां अणुअणू
विद्युताच्या सूक्ष्मतमकणिं वसत सत्याचा अणू ॥

तेजमेघापासुनी ही दृश्य सृष्टी विकसली
मूळ हेतू ज्ञात जरि ना, सांगुं तो कालांतरीं' ॥

## निर्माल्य

### ११

ज्ञात हो कालांतरानें भाविकालाचें सुख
जीवघटिका आज भरते—आजचें ना तें सुख ॥

मूळ तें अज्ञात जोंवर सकल जग अज्ञात हें
ज्ञात झालें जें तुह्मां तें ज्ञान ना होऊं शके ॥

—पृथ्वि फिरली भास्कराच्या भोंवतीं वा उलट तें
काय त्याचें आमुच्या जीवास वा सौख्यास तें? ॥

स्वैरता वैमानिकांची, भूमिवरि तें चालणें,
दिपविणें घर दिवटिनें, विद्युत्प्रकाशें नटविणें—॥

भेद सारे क्षणिक ना ते? सान्तची सुख तें न कां?
बुद्धिवैभव चकवि मन परि शांतवी हृदयासि कां? ॥

## निर्माल्य

१२

ज्ञान अन् विज्ञान विसरूं, आण पेला तो सखे
पंडितांचीं गूढ तत्वें मूक होतिल निश्चयें ॥

भव्य नौका बांधिली, दर्यावरी ध्वज रोविला
भव्यतर त्या हिमनगानें फोडिली, ध्वज पाडिला ॥

तोडण्या दिक्कालबंधन वायुनौका सोडिली
शास्त्रवेत्ते हर्षले, गगनांतुनी ती चालली ॥

स्फोट झाला, यंत्र फुटलें, पसरल्या ज्वाला वरी
शास्त्रवेत्ते हाय! गेले, भस्म झाले त्यांतची ॥

## निर्माल्य

ज्ञानवैभव गौरवीती आजच्या धुंदींत जे
भस्म होतिल ना उद्यां सरणांत वा कबरींत ते ॥

आण सखये, आण पेला—घेइ भोंवळ मन्मना
सुन्न करुं दे दुःखमय या जाणिवेच्या कणकणा ॥

## निर्माल्य

### १३

कैक वर्षे व्याधिनें तूं ग्रस्त होतिस जिवलगे
त्रस्त होता जीव माझा, खिन्नता मन व्यापि गे ॥

रात्र होतां वेदना तव वाढती त्या अंत न
जीवभावें शुश्रुषा तव करित असतां खंड न ॥

हात थकले, देह शिणला, मिटति डोळे सहजची
पाहुनी असहायता सरली न माला आंसुची ॥

सतत घडतां हें असें मग आटलीं तीं आंसवें
हृदयभेदी हांकही तव हलवि ना मम वृत्ति गे ॥

—मानवी ते यत्न सरतां दैव आलें हांसत—
ज्ञान अमुचें! प्रीति अपुलि!—आण पेला हांसत ॥

## निर्माल्य

### १४

बाग सुंदर सान ती, घर आपुलें तें चिमुकलें
दूर जगताहून किति तें स्थान अपुल्या प्रीतिचें ॥

तेथ राहूं वाटलें कालाचिया अंतावरी
धुंद होउनि, प्रीतिच्या रंगांत रंगुनि निशिदिनीं ॥

ये जगाहुनि तों तुफान्—हिमशीतता वायूमधें
तरुवरी चिमलीं फुलें—अन् भाव ते हृदयामधें ॥

पांखरें गेलीं दुरी सोडूनिया फुलबाग ती
जीवनार्थचि दूर गेलों सोडुनी अपुली कुटी ॥

वाटलें, जें इच्छिलें,—तें संपलें दैवेच्छया
आण सखये भरुनि, पेला, पान करुं ये स्वेच्छया ॥

## निर्माल्य

१८

ज्या जगाला सोडुनी घर दूर रचिलें आपण
तेंच जग ये जवळि आतां, होइ तेंची जीवन ॥

दूर होतों जोंवरी, बघुनी न दिसलें हें जग
काळ परि विपरीत येतां, फुटुनि गेलें काळिज ॥

जीवनार्थचि कितिक मरती कळति त्यांच्या वेदना
प्रश्न त्यांचे, दुःख त्यांचें—भिन्नति त्या सहवेदना ॥

प्राणियांचे वंश लढती जीवनार्थचि या जगीं
अंधतेनें, क्रूरतेनें, आत्मप्रौढी मिरवुनी ॥

बुद्धिवैभव गौरवीती मानवांचें जे सदा
दिसत ना त्या निर्धनांच्या हृदयभेदी आपदा ॥

## निर्माल्य

सत्य शिव वा सुंदराचीं गोड गाणीं गाति जे
हंसत पायीं तुडविती अपुलेचि बांधव जनहि ते ॥

संस्कृतीचे, प्रगतिचे वा गोडवे गाती मुखीं
गात असतां, रक्त चाखिति श्रमजिवींचें ते सुखी ॥

—ज्ञान, प्रगती मानवांची—दंभ अन् निर्लज्जता
आण पेला विसरुं दे या किळसवाण्या जीविता ॥

## निर्माल्य

१६

या जगाशीं काय अपणा ? दुःखितांशीं काय तें ?
फाटतां आकाश तें मग ठिगळ केवीं लावगें ? ॥

सत्य जरि हें—जीव तुटतो याचसाठीं प्रेमले—
चिमुकली अपुली ' निरा ' ना—प्रीतिसुम हें सोनुलें ? ॥

जीवघटिका अपुलि भरतां कोण मग सांभाळिल ?
दुःखि होतां, कष्टि होतां कोण तिज कुरवाळिल ? ॥

अंतिचा क्षण ये न तोंवरि सेवुं आपण या जगा
कळकळीच्या यत्नयोगें भाग सुखवूं दवलिसा ॥

## निर्माल्य

याच जगतीं सुमन हें सोडूनि जाणें आपणा
निश्चयें सेवाच अपुली रक्षि ना अपुल्या सुमा ? ॥

यत्न हे फळतील कां ? विकसेल प्रीतीसुमन ना ?
वेडि आशा, वेडि इच्छा—आण पेला, आण ना— ॥

## निर्माल्य

### १७

प्रीतिसुमना पाहुनी उडतीं मनांतुनि पांखरें
विसरुनी दिक्कालबंधन व्यापिती ब्रह्मांड हें ॥

—जेधवां आलों जगीं नांवेंहि नव्हतीं ठाउक
आपणां कळतांहि नांवें पटलि न कधीं ओळख ॥

दृष्टिला मिळतांहि दृष्टी, नाहिं हलले भाव ते
हळुंच एकाएकिं उघडे अनंताचें दार तें ॥

भावमीलन त्या क्षणीं अव्यक्तरूपीं रंगलें
प्रीतिसुम कालांतरानें व्यक्तरूपीं उमललें ॥

## निर्माल्य

### १८

कुठुनि आले भाव ते ? ते उसळले क्षणिं त्याच कां ?
दार उघडुनि अनंताचें प्रीतिमीलन होइ कां ? ॥

प्रीतिसुम भावांत होतें बीजरूपें आपुलें ?
पूर्वजांच्या हृदयिं कां हे भाव होते आपुले ? ॥

मानवांचा वंश आला तिथुनि आलें सुमन कां ?
जीवसृष्टीमधुनि आला मानवांचा वंश कां ? ॥

स्थूलसृष्टीमधुनि आली जीवसृष्टी कां इथें ?
स्थूलतेच्या सूक्ष्मतमकणिं जीवबिज कां वसतसे ? ॥

तेजमेघीं विलसलें कां अंशरूपें बीज तें ?
तिथुनि त्यानें व्यापिलें कां अखिलहा ब्रह्मांड हें ? ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५६२०

## निर्माल्य

१९

जेधवां हें सुमन नव्हतें वाटलें अपुल्या मनीं
दूरसे जगताहुनी एकांत निर्जनशा स्थलीं ॥

शांतिनें जावें, बसावें विसरुनीया ऐहिक
आपुल्या प्रीतीमधें रंगूनि कल्पांतावर ॥

विश्व हें दोघांत विरलें दोन होतों जोंवर
प्रीतिसुम फुलतांचि हें दृष्टीस ये रूपांतर ॥

या जगा आतां न वाटे दूर जावें सोडुनी
वळुनि वळुनी पाहुं मागें येइ जाणें ज्या क्षणीं ॥

प्रीतिच्या सुमनांत अपुल्या जीव अपुले गुंतले
या जगीं विकसेल सुम, जग प्रीति-अंगण जाहलें ॥

## निर्माल्य

२०

विकसतां नव सुमन हें पसरेल कां नवपरिमल?
नवनवीं फुलवील सुमनें आपुलें प्रीतीफुल? ॥

जीविचा तो भाव कां बहरेल या जगतावरी?
नयन अपुले ह्मणुनि कां आंसावले मायेवरी? ॥

या करीं सामर्थ्य असतें निर्मिलें असतें तर
दैव तें धिक्कारुनी नव राज्य या सृष्टीवर॥

काय होणें? कोण जाणें? भाव परि हे आंधळे
मौज करि अज्ञात शक्ती, जीव हा तिज खेळणें ॥

## निर्माल्य

### २१

दृष्टी तव ती भावमय खिळताचि मम वदनावरी
आंतला कल्लोळ सारा लोपतो शून्यांतरीं ॥

पतंगाचें भ्रमण निष्फळ संपतें दीप्तीमधें
जीविताचें भ्रमण सारें मावळें प्रीतीमधें ॥

कासया ही ज्ञानतृष्णा ? कासया ही टोचणी ?
आसरा तो अंतिचा कां शांतवीना जांचणी ? ॥

—कुतुहलानें विकसलेले नयन "निरि" चे जेधवां
पुसति मजला सृष्टिविषयीं प्रश्न किति तरि तेधवां ॥

## निर्माल्य

काय सांगूं सोनुलीला?—कल्पना येतां मनीं
तुटति सारे जीवतंतू—खिन्नता पसरे मनीं ॥

—शक्ति सारी एकवटुनी फेक दृष्टी मजकडे
आर्द्र होतां आंसुनीं—पेला करी तो मजपुढें ॥

## निर्माल्य

### २२

तेजमेधापासुनी ही जीवगंगा वाहते
अंत तो अज्ञात हीचा मूळही अज्ञात तें ॥

ओघगतिनें रंगमय ते बुडबुडे येती वरी
तेजकिरणीं नाचनाचुनि विरति फिरुनी ते जलीं ॥

नाचतांना रंग खुलती तेजकिरणांचे नवे
ज्ञान अन् विज्ञान भासे मानवांना नवनवें ॥

भाव अपुले, ध्येय अपुलें—रंगमय ते बुडबुडे
अंतरींची तीव्र तळमळ पेयपानीं बुड़वुं दे ॥

## निर्माल्य

२३

तारकांचा नाच चाले गोफ गुंफिति किरण ते
खेळ होई त्याच समयीं चार नयनांचा सखे ॥

खेळ रमला—गोफ तुटला—खूण पटली अंतिची—
भाव जुळले—एक झाले—साक्ष पटली प्रीतिची ॥

रंगला हा जीव सखये शाश्वताच्या अंगणीं
बंधनांचें जाल विरलें तेजमय सत्यांतरीं ॥

—जीव थकला—भाव शिणले—सत्यगुण तो हरपला—
जवळ असतां तूंहि सखये खेळ कां तो संपला? ॥

## निर्माल्य

### २४

सांग सखये काय झाले? जीव कां हा धडपडे?
पूर्ण झाल्या हृदय-आशा—वीज कुठुनी कडकडे? ॥

कां दिसेना? कां कळेना? थांब क्षण, मज शोधुं दे-
दूर दिसतो ज्ञानघन—तेथेंच चपला चमकते? ॥

पाहुं दे डोळाभर—पहिल्या क्षणाची हो स्मृती—
हाय! गेली अंधकारीं—उरलि आतां ही मृती! ॥

—आण सखये, आण पेला, घोट घेऊं अंतिचा
विस्मृती-निर्वातप्रांतीं दीप मालवुं जीविचा ॥

## निर्माल्य

२८

शेकडोंशे योजनांचा परिघ पृथ्वीचा असे
शेकडों सहस्रावधींच्या अंतरीं ग्रहगोल ते ॥

कोटिकोटी योजनांवरि चमकती त्या तारका
कल्पनेच्या पार गतिनें फिरत भव्यचि व्याप हा ॥

गगन मंडळ नृत्य करितें तांडवाचें सर्वदा
तारकांची माळ तुटते, फेंकिली जाते सदा ॥

बनतिं त्यांचीं कितिक जगतें, कितिक विरतीं अंतरीं
मानवांचे क्षुद्र कण हे येति जाती त्यांवरी ॥

ज्ञान, प्रीती, प्रगति, सुख तें—त्या कणांच्या वल्गना
आण पेला—कालनिद्रा जीवतापा हरिल नां ? ॥

## निर्माल्य

### २६

जोंवरी पहिल्या क्षणाची धुंद तोंवरि वाटलें
तारकांची माळ तव कंठांत घालिन प्रेमले ॥

बघत असतां नील नाभिं आटूनि गेलीं आंसवें
नयनिंचें तें तेज विरतां लोपलीं तारासुमें ॥

तेजमय आशा न फळल्या—अंतरांतुनि ही निघे
गंध ना—निर्माल्यमाला—गोड नां परि स्मृति सखे! ॥

येइ सखये, जवळ येई—जीव थकला निर्बल
निखळुं दे पेल्यांत हृदिचें रक्तमय अश्रूजल ॥



।

इशरते कतरा है दरियामें फना हो जाना ।
दर्दका हदसे गुजरना है दवा हो जाना ॥

दिलसे मिटना तेरी अंगुश्त हिनाइका खयाल ।
हो गया गोश्तसे नाखुन का जुदा हो जाना ॥

इन आबलो से पावके घबरा गया था मैं ।
जी खुश हुवा है राह को पुरखार देखकर ॥

—ग़ालिब

५६२०
REFBK-0005620
REFBK-0005620